प्रस्तावना :

महाराष्ट्राच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करतांना आधुनिक कालखंड डोळ्यासमोर उभा राहतो. मध्ययुगीन काळ जवळपास ७०० वर्षांचा पण आधुनिक काळ फक्त १५० वर्षांच्या आसपास असुन त्यात झालेली सामाजिक स्थित्यंतरे त्यापूर्वी कधीच झाली नाहीत. समाज रचनेत मागील मोठ्या कालावधीत विशेष स्थित्यंतरे म्हणावी अशी घडली नाहीत. मात्र आधुनिक काळात धार्मिक प्रबोधनाबरोबरच सामाजिक प्रबोधनाचेही कार्य समांतर चालू राहिले आणि समाजचे चित्र बदलून गेले. सामाजिक बदलाची गती पुन्हा वाढली. पाश्चात्य विद्येमुळे इ. स. १८०० नंतर सापाने कात टाकावी तशी भारतीय व महाराष्ट्रीयन समाज जीवनाने कात टाकली.

महाराष्ट्रीयन समाज जीवनाचा भाग असलेला वंजारी समाज सुध्दा या बदलाला अपवाद राहिला नाही. फिरता फिरता व्यापार करणारे म्हणजे वनचारी, वंजारी किंवा वनात संचार करणारे वनचारी याचेच रुपांतर वंजारी, वंजारा, वजार असे झाले असावे. अनेक वर्षांपूर्वी राजस्थानातून आलेला हा समाज ब्रिटीश पूर्व काळात माल वाहतूक व माल पुरवठा करणारा मोठा समाज होता. वंजारी समाजाचे कार्य फक्त नागरी व व्यापाऱ्यांसाठीच माल पुरवठा करणे येथेच संपत नाही. या समाजाचे राजेशाही राजव्यवस्थेसाठीचे सर्वात मोठे योगदार म्हणजे युध्द काळात सैन्यासाठीचा अन्नधान्याचा पुरवठा करणे. भरपूर अरण्ये अवघड घाट रस्त्याचा अभाव यामुळे बैलगाड्यांचा उपयोग नसल्याने बैलाचा मोठ्या प्रमाणावर मालवाहतुमीसाठी वापर करायला सुरुवात या समाजाने केली.

वंजारी स्वत: व्यापार करीत माल वाहतुकीसाठी बैलांची आवश्यकता असल्याने हा समाज पशुंच्या पैदाशीतही अग्रेसर राहिला. यासाठी पशुपालन हा व्यवसायही हा समाज करत असे. या संदर्भात चेऊल येथील बंदरात हजारो बैलांची वंजारी तांडे यत असल्याची नोंद कोलाबा गॅझेटियरने केलेली आढळते. वंजारी समाजाला मोगलांनी वतने दिलेच्याही नोंदी आढळतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यातही वंजारी समाजाचा मोठा वाटा होता. लखोजी जाधवरावांच्या सैन्यातही वंजारी समाजाचा मोठा वाटा होता. महाराणा प्रतापचे मल्ला व फत्ता हे प्रमुख वंजारी सरदार होते.

अठराव्या शतकापर्यंत माल वाहतुक व फिरता व्यापार करणारा वंजारी समाज वाहतुकीच्या व दळणवळणाच्या साधनांतील बदलामुळे स्वत:च्या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील राहिला. यासाठी समाजाला कुठंतरी स्थिर होऊन वेगवेगळे व्यवसाय शोधावे लागले.

काही हंगामी शेतीकडे वळले, काही मोलमजूरीकडे वळले, काही हमालीकडे वळले, काही उसतोड कामगार म्हणून काम करु लागले. काही पशुपालक म्हणून डोंगर दऱ्यात स्थिर झाले. परिस्थितीशी झगडत जीवन जगु लागले. या परिस्थितीत हळूहळू बदल होत असतांना दिसत आहे. या बदलांचा आढावा घेणे गरजेचे आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

इतिहासकार इ. एच. कार यांच्या मतानुसार समाज आणि व्यक्ती हे दोन्ही घटक अविभाज्य आहेत. दोन्ही परस्पपुरक असून विरोधी कधीही नसतात. व्यक्ती आणि समाज आपआपल्या हक्कासाठी, विकासाप्रती जागरुक असतात. म्हणून व्यक्तीचा विकास म्हणजे समाजाचा विकास आणि समाजाचा विकास म्हणजे व्यक्तीचा विकास होय. समाज हा नेहमी प्रवाही असतो. बदलणारा असतो. काळानुसार, स्थळानुसार समाजात योग्य, अयोग्य बदल होत असतात. वंजारी समाज ही त्याला अपवाद नाही. वंजारी समाज महाराष्ट्रात स्थिर स्थावर झाल्यापासून यामध्ये अनेक सर्वांगिण स्थित्यंतरे होत आहेत.

वंजारी समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा, मागासलेपणा, दारिद्र्य यांची जाणीव निर्माण होऊन त्या नष्ट होण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे घटक ठरत आहे. समाज आधूनिक युगात प्रवेश करता झाला. समाजाची सर्वांगिण प्रगती आज होत आहे.

भौगोलिक स्थळानुसार, काळानुसार समाजाचे नवीन प्रश्न, समस्या, अडचणी निर्माण होत असतात. नव नवीन आव्हाने निर्माण होत असतात. या सर्वांची सोडवणूक होण्यासाठी नवीन नेतृत्व निर्माण होऊन चळवळी राबविल्या जातात. वंजारी समाज ग्रामीण भागात आणि डोंगरदऱ्यात असल्याने उसतोड कामगार आणि पाटपाण्याची समस्या नव्हे तर पिण्याच्या पाण्याचीच समस्या सोडविण्यासाठी अनेक आंदोलने व त्यांचे नेतृत्व करणारे नेते यांचे कार्यही महत्त्वपूर्ण आहे. आर्थिक गरजांची पुर्तता करण्यासाठीची करावी लागणारी स्थलांतर वृत्ती यामुळे इतर समुह समाज घटकांशी येणारा संपर्क हा निश्चितच समाजासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे. या परिस्थितीची माहिती जाणून समजून घेण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे ठरेल.

पूर्वीच्या संशोधनाचा आढावा आणि अधिक संशोधन करण्याची गरज :

आजच्या काळात भारताच्या व महाराष्ट्राच्या सामाजिक स्थितीवर प्रकाश टाकणारी अनेक संशोधने झाली. पण वंजारी समाजावर मात्र जास्त संशोधन सामाजिक दृष्टीने झालेले आढळत नाही. वंजारी समाजातील नेत्यांच्या कार्यावर संशोधन झालेले आढळते. 'श्री. बबनरावजी ढाकणे जीवन कार्य एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर डॉ. उदमले एस. बी. यांनी संशोधन केलेले आहे. तसेच, 'महाराष्ट्रातील वंजारी समाजाचा इतिहास' या विषय ग्रंथातून डॉ. घोलप यांनी या विषयावर प्रकाश टाकला आहे. 'वनजारी, बनजारी' या विषयाला अनुसरुन पी. के. पाटील यांनी वंजारी समाजाची माहिती दिलेली आहे.

आज अहमदनगर जिल्ह्यातील वंजारी समाजातील काही ठराविक समुह घटक सोडले तर इतर समाजाची अवस्था दयनिय आहे असे वाटते. म्हणून या समाजाच्या सर्वांगिण परिस्थितीचा अभ्यास करणे आवश्यक वाटते. तसेच या विषयावर अधिक प्रकार्षाने संशोधन व्हावे अशी माझी इच्छा आहे. हे संशोधन या समाजाच्या अभ्यासासाठी पुढील काळात उपयुक्ततेचे राहणार आहे. म्हणून वंजारी समाजाच्या सर्वांगिण विकासासाठीचे प्रयत्न आणि सद्यस्थितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधन होणे आवश्यक आहे, गरजेचे आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

१) वंजारी समाजाच्या ऐतिहासिक परिस्थितीचा आढावा घेणे.

२) वंजारी समाजाच्या सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

३) वंजारी समाजाच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

४) वंजारी समाजाच्या राजकीय परिस्थितीचा आढावा घेणे.

५) वंजारी समाजाच्या स्थलांतर वृत्तीचा अभ्यास करणे.

६) वंजारी समाजातील लोकांचे राहणीमान व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

१) सामाजिक परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे.

२) आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणात वंजारी समाजाच्या नेत्यांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

३) समाजाचा सर्वांगिण विकास होणेसाठी राजकिय सहभाग मिळणे आवश्यक आहे. यासाठी सहकार, स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये जास्त प्रतिनिधित्व आवश्यक आहे.

४) वंजारी समाज जीवन जगण्यासाठी परिस्थितीनुरुप व्यवसाय स्वीकारतांना दिसून येतो.

५) अहमदनगर जिल्ह्यातील वंजारी समाजातील लोकांचे राहणीमान उच्च प्रतीचे नाही.

६) वंजारी समाजातील बहुसंख्य लोक उसतोडणी कामगार म्हणून काम करत आहेत.

७) वंजारी समाजातील लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारणेसाठी जलसिंचन सुविधा व रोजगार निर्मितीची आवश्यकता आहे.

संशोधन पध्दती व साधने :

संशोधन असो अथवा कोणतेही कार्य असो ते व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी पहिल्यांदा त्याचा आराखडा तयार करावा लागतो. सामाजिक शास्त्रांच्या संशोधनामध्ये संशोधन आराखडा ही एक प्रमुख पायरी आहे. संशोधन पध्दतीमध्ये संशोधन आराखडा असल्यामुळे संशोधकाला निश्चित दिशा मिळते. वेळ, पैसा, श्रम यांची बचत होते. प्रस्तूत संशोधन हे सामाजिक शास्त्रातील असल्याने इतिहासाच्या सर्वच पध्दती उपयुक्त ठरतात. या संशोधनासाठी प्रामुख्याने विश्लेषण, वर्णनात्मक, परिचयात्मक, ऐतिहासिक मुलाखत आणि प्रश्नावली या सारख्या पध्दतींचा वापर करण्यात येणार आहे.

प्राथमिक साधनांमध्ये गॅझेटियर व ब्रिटीश सरकारचे अहवाल, शासकिय कागदपत्र यांचाही आधार घेण्यात येईल. दुय्यम साधनांमध्ये संदर्भग्रंथ, नियतकालिके व वृत्तपत्रांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरणाची रुपरेषा :

‘अहमदनगर जिल्ह्यातील वंजारी समाज एक ऐतिहासिक अभ्यास’ या विषयाचा अभ्यास पुढील प्रकरणानुसार करण्यात येईल.

प्रस्तावना

१) वंजारी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

२) अहमदनगर जिल्ह्यातील वंजारी समाज.

३) अहमदनगर जिल्ह्यातील वंजारी समाजाची सामाजिक परिस्थिती.

४) अहमदनगर जिल्ह्यातील वंजारी समाजाची आर्थिक परिस्थिती.

५) अहमदनगर जिल्ह्यातील वंजारी समाजाची राजकीय परिस्थिती.

६) समारोप.

पहिल्या प्रकरणात वंजारी समाजाचा थोडक्यात ऐतिहासिक आढावा घेण्यात येईल.

दुसऱ्या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्यात वंजारी समाज कोणकोणत्या तालुक्यात आढळून येतो याची माहिती दिली जाईल.

तिसऱ्या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्यातील वंजारी समाजाची सामाजिक परिस्थितीवर प्रकाश टाकला जाईल.

चौथ्या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्यातील वंजारी समाजाची आर्थिक परिस्थितीचा अभ्यास केला जाईल.

पाचव्या प्रकरणात अहमदनगर जिल्ह्यातील वंजारी समाजाची राजकीय परिस्थितीचा अभ्यास करण्यात येईल.

सहाव्या प्रकरणात संशोधनातून हाती आलेले निष्कर्ष मांडण्यात येतील.

प्रस्तुत शोध आराखड्यात संशोधना दरम्यान बदल होण्याची शक्यता आहे.

संदर्भ साधने :

१) अभिलेखागारातील मुळ कागदपत्रे.

२) महाराष्ट्रातील ज्ञानकोश, डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर.

३) महाराष्ट्र शब्दकोश - दाते, कर्वे

४) भारतीय संस्कृती कोश - पंडित महादेव शास्त्री जोशी.

५) भारतीय समाज विज्ञान कोश - स. मा. गर्गे.

६) मराठी विश्वकोष - मराठी साहित्य व संस्कृती मंडळ

७) सामाजिक संशोधन पध्दती, डॉ. प्रदिप आगलावे, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपुर

८) इतिहास म्हणजे काय? ई. एच. कार., वि. गो. लेले (मराठी अनुवाद), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

९) सर्वात्म वंजारी - ॲड. सौ. मायावती सोसे, गणराज प्रकाशन, अहमदनगर.

१०) वंजारी समाज - डॉ. वसंत मुंढे, सविता प्रकाशन, उस्मानाबाद.

११) भटक्या विमुक्तांचे अंतरंग, रामनाथ चव्हाण, सुभाना प्रकाशन, पुणे.

१२) दक्षिण भारताच्या जाती आणि जमाती - इ थर्सटन

१३) महाराष्ट्रातील वंजारी समाजाचा इतिहास - डॉ. घोलप, हर्षवर्धन पब्लिकेशन, परळी.

१४) श्री. बबनरावजी ढाकणे जीवन व कार्य एक चिकित्सक अभ्यास - डॉ. उदमले एस. बी.

१५) वनजारी वनचारी - पी. के. पाटील (आंधळे) सुराकिर्ती प्रकाशन, नागपूर.

१६) जातिसंस्थचा इतिहास आणि काही जातींचा इतिहास - सोनावणी एस. - प्राजक्त प्रकाशन, पुणे.

१७) संत भगवान बाबांचे चरित्र - ले. चव्हाण व्ही. डी. - विवेक मुद्रणालय, औरंगाबाद, १९७९.

१८) मोनोग्राफ ऑफ द वंजारा - क्लॅम १८६९- कंबरलेज.

१९) जंगल लाईफ इन इंडिया - के. श्री. बॉल.

२०) आर्मी ऑफ द इंडियान मोगलस - ले आयर्विन.

२१) वंजारी आणि क्षत्रिय मराठे : माधवराव आव्हाड, सीताबर्डी, नागपूर - १० नोव्हेंबर १९२१.

२२) वंजारी क्षत्रिय इतिहास - एम. बी. उबाळे, महाराष्ट्र इले. प्रिंटिंग प्रेस, धुळे १ जुलै१९७२.